THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 7TH AUGUST 1890.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

---

**खानेसुमारी करण्यासंबंधी कित्येक बाबतींविषयीं ठराव करण्याबाबदच्या आक्टाचा मसुदा.**

ज्यापेक्षां सन १८९१ सालीं ब्रिटिश इंडियाची खानेसुमारी करण्याविषयीं ठराव झालेला असून ती करण्यासंबंधी कित्येक बाबतींविषयीं कायदेशीर तजवीज करणें योग्य आहे, त्यापेक्षां हल्लीं खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहे:—

सरनामा व सुरुवात.

१. (१) या आक्टास सन १८९० चा हिंदुस्तानचा खानेसुमारीचा आक्ट असें ह्मणावें; आणि

(२) तो एकदम अमलांत येईल.

व्याप्ति.

२. (१) हें कलम व कलमें ३, ४, १३ व १४ हीं सगळ्या ब्रिटिश इंडियास लागू आहेत.

(२) बाकीचीं कलमें, ब्रिटिश इंडियाचे जे भाग स्थानिक सरकार सरकारी गझेटांत जाहीरनामा प्रसिद्ध करून फर्मावील त्या भागांस मात्र लागू होतील.

खानेसुमारीवरील कामगारांची नेमणूक.

३. (१) स्थानिक सरकाराला, कोणत्याही मनुष्यास, त्याच्या नांवानें किंवा त्याच्या हुद्याच्या नांवानें, कोणत्याही निर्दिष्ट केलेल्या प्रदेशांत खानेसुमारी करण्यासाठीं, तींत मदत करण्यासाठीं किंवा ती करण्याच्या कामावर देखरेख ठेवण्यासाठीं नेमण्याचा अधिकार आहे.

(२) याप्रमाणें नेमलेल्या मनुष्यांस खानेसुमारीवरील कामगार असें ह्मणावें.

(३) खानेसुमारीवरील कामगार नेमण्याचा या कलमावरून दिलेला अधिकार आपणास योग्य वाटेल त्या अधिकाऱ्याकडे सोंपण्याचा स्थानिक सरकारास अख्त्यार आहे.

खानेसुमारीवरील कामगारांच्या नेमणुकीचा पुरावा व त्यांस सरकारी नौकर समजणें.

४. (१) अमुक मनुष्यास अमुक प्रदेशासाठीं खानेसुमारीवरील कामगार योग्य रीतीनें नेमलें आहे असा, त्या बाबतींत स्थानिक सरकारानें अधिकार दिलेल्या कोणत्याही अमलदाराच्या सहीनिशीं लेखी हुकूम असला ह्मणजे तो त्या नेमणुकीचा निरुत्तर पुरावा आहे असें समजावें.

(२) खानेसुमारीवरील सर्व कामगार हे इंडियन पीनल कोडाच्या अर्थाप्रमाणें सरकारी नौकर आहेत असें समजावें.

खानेसुमारीवरील कामगारांचीं कामें कांहीं बाबतींत कशीं करावीं तें.

५. (१) (अ) मलिका माआझमा यांच्या लष्करी किंवा अर्मारी फौजेंतील मनुष्यांच्या कोणत्याही टोळीची किंवा कोणत्याही लष्करी तारवाची कमांड ज्या ज्या लष्करी किंवा अर्मारी अमलदाराकडे असेल तसा कोणताही अमलदार,

(ब) पैलट किंवा हार्बर-मास्तर खेरीज करून ज्या ज्या मनुष्याच्या स्वाधीन किंवा ताब्यांत कोणतेंही तारूं असेल तसा कोणताही मनुष्य,

(क) ज्या ज्या मनुष्याच्या स्वाधीन वेड्यांचें अगर इतर इस्पितळ, वर्कहौस, तुरुंग, रिफॉर्मेटरी किंवा लाकप असेल, किंवा कोणतेंही सार्वजनिक खातें, दानधर्मालय, धर्मालय किंवा विद्यालय असेल तसा कोणताही मनुष्य,

(ड) कोणतीही सराई, होटेल, बोर्डिंग-हौस, किंवा लाजिंग-हौस, किंवा क्लब, हीं चालविणारा किंवा यांची व्यवस्था पाहणारा कोणताही मनुष्य, आणि

(ई) स्थावर मिळकतीचा भोगवटा करणाऱ्या ज्या मनुष्याच्या हाताखालीं खानेसुमारी करण्याच्या वेळीं अशा मिळकतीवर किंवा मिळकतींत निदान पन्नास मनुष्यें चाकरीस असतील तसा कोणताही मनुष्य,

यास, जीं मनुष्यें खानेसुमारीच्या वेळीं त्याच्या दिमतींत किंवा स्वाधीन असतील, किंवा त्याच्या घरांत रहात असतील किंवा सदरहू मिळकतीवर किंवा मिळकतींत हजर असतील त्या मनुष्यांच्या संबंधानें खानेसुमारीवरील कामगाराचीं कोणतींही कामें करण्याविषयीं जिल्हा माजिस्ट्रेटानें किंवा कलकत्ता, मद्रास व मुंबई या शहरांमध्यें या बाबतींत स्थानिक सरकार नेमील त्या अमलदारानें लेखी हुकूम करून फर्माविलें असतां, तीं कामें त्या असामीनें केलीं पाहिजेत.

(२) खानेसुमारीवरील कामगारासंबंधी या आक्टांतील सर्व ठराव, सदरहू मनुष्यें सदरहू कामें करीत असतील तेव्हां त्यांस जितक्या अंशीं लागू होऊं शकतील तितक्या अंशीं लागू होतील; आणि कोणत्याही मनुष्यास जें कोणतेंही काम करण्याविषयीं या कलमाअन्वयें फर्माविलें असेल तें काम तो मनुष्य करण्यास इनकार अगर हयगई करील तेव्हां त्या मनुष्यानें इंडियन पीनल कोडाच्या १८७ व्या कलमाअन्वयें अपराध केला आहे असें समजलें जाईल.

कित्येक मनुष्यांस मदत देण्याविषयीं हुकूम करण्याचा जिल्हा माजिस्ट्रेटास अधिकार.

६. (१) जिल्हा माजिस्ट्रेटास, आपल्या जिल्ह्यांतील जमिनीचे सर्व मालक व भोगवटाकरणारे, सत्ताप्रकारानें जमिनी धारणकरणारे, इजारदार, जमीनमहसुलाचे * असैनी, आणि सन १८७९ चा बर्मा † फिशरी आक्ट याअन्वयें फिशरींचे पट्टेदार, किंवा त्यांचे मुखत्यार यांस, आणि सन १८७० चा गांव चौकीदारी आक्ट (बंगाल), किंवा सन १८८७ चा छोटा नागपूर गांव पोलीस आक्ट, याअन्वयें त्याच्या जिल्ह्यांत नेमलेल्या पंचाइतींच्या सर्व मेंबरांस, खानेसुमारी करण्याच्या वेळीं जीं मनुष्यें, प्रसंगाप्रमाणें, सदरहू मालकांच्या, भोगवटाकरणारांच्या, धारणकरणारांच्या, इजारदारांच्या व असैनींच्या जमिनींवर, सदरहू फिशरींच्या हद्दींच्या आंत किंवा ज्या गांवांसाठीं सदरहू पंचाइती नेमल्या असतील त्या गांवांत असतील त्यांची खानेसुमारी करण्याच्या कामीं आपणास जरूर लागेल ती मदत देण्याविषयीं लेखी हुकूम करून फर्माविण्याचा अधिकार आहे.

(२) सदरहू हुकुमांत, कोणत्या प्रकारच्या मदतीची जरूरी आहे तें लिहिलें पाहिजे, आणि सदरहू मालक, भोगवटाकरणारे, धारणकरणारे, इजारदार, असैनी, पट्टेदार किंवा त्यांचे मुखत्यार, आणि सदरहू पंचाइतींचे मेंबर यांस तो हुकूम मानणें भाग आहे.

---

*ज्यांकडे जमिनमहसूल सोंपून दिला आहे असे, म्हणजे इनामदार वगैरे.

†मासे धरण्याची जागा.

७. कोणत्याही प्रदेशावर नेमलेल्या कोणत्याही खानेसुमारीवरील कामगारास त्या प्रदेशांतील मनुष्यांस जे प्रश्न विचारण्याविषयीं, या बाबतींत स्थानिक सरकारानें काढलेल्या व सरकारी गॅझेटांत प्रसिद्ध केलेल्या समजुतींच्या द्वारें फर्माविलें असेल, ते सर्व प्रश्न त्या सर्व मनुष्यांस विचारण्याचा अशा दरेक कामगारास अधिकार आहे. खानेसुमारीवरील कामगारांनीं प्रश्न विचारणें.

८. ज्या ज्या मनुष्यास सदरील सातव्या कलमाअन्वयें कोणताही प्रश्न विचारला असेल, त्या प्रत्येक मनुष्यास त्या प्रश्नाचें उत्तर त्याच्या उत्तम माहितीप्रमाणें अगर समजुतीप्रमाणें देणें कायद्यानें भाग आहे असें समजावें : प्रश्नांचीं उत्तरें देणें अवश्य आहे.

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं कोणत्याही मनुष्यास आपल्या कुटुंबांतील कोणत्याही स्त्रीचें नांव सांगणें, तसेंच कोणत्याही स्त्रीस आपल्या नवऱ्याचें किंवा मयत नवऱ्याचें नांव सांगणें भाग आहे असें मानूं नये.

९. ज्या ज्या मनुष्याकडे कोणत्याही घराचा, आवाराचा, तारवाचा किंवा दुसऱ्या जागेचा भोगवटा असेल त्या प्रत्येक मनुष्यानें, खानेसुमारीवरील कामगार खानेसुमारीच्या कारणांकरितां त्या ठिकाणीं जाण्याची जी सवड मागतील व जी देशाच्या रिवाजाकडे लक्ष्य देऊन वाजवी दिसेल, तशी सवड त्यांस दिली पाहिजे; तसेंच त्यानें, खानेसुमारीच्या कारणांकरितां जरूर असणारीं अक्षरें अगर नंबर, सदरहू घर, आवार, तारूं अगर दुसरी जागा यांवर अगर यांला रंगानें घालण्याची अगर लावण्याचीही सवड त्यांना दिली पाहिजे. घर वगैरेचा भोगवटाकरणारानें त्यांत जाऊं देणें व त्यांला नंबर घालूं देणें.

१०. (१) कोणत्याही प्रदेशावर नेमलेल्या कोणत्याही खानेसुमारीवरील कामगारास, त्या प्रदेशांतील कोणत्याही राहत्या घराचा किंवा त्या घराच्या निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही भागाचा भोगवटाकरणारानें खानेसुमारी करण्याच्या वेळीं त्या घरांत अगर भागांत राहणाऱ्या मनुष्यांबाबद्दचा स्थानिक सरकारानें फर्माविला असेल तसा तपशील भरण्यासाठीं त्या घरांत एक गणतीपत्रक, या बाबतींत स्थानिक सरकारानें केलेल्या हुकुमांस अनुसरून, देऊन ठेवण्याचा किंवा ठेवविण्याचा अधिकार आहे. घराचा भोगवटा ज्याकडे असेल त्यानें पत्रक भरणें.

(२) जेव्हां असें कोणतेंही गणतीपत्रक सदरहूप्रमाणें देऊन ठेवलें असेल तेव्हां ज्या घरासंबंधीं किंवा भागासंबंधीं तें असेल त्या घराचा किंवा भागाचा भोगवटाकरणारानें तें, वर सांगितल्या वेळीं जीं मनुष्यें, प्रसंगाप्रमाणें, त्या घरांत किंवा भागांत राहत असतील त्या मनुष्यांपुरतें आपल्या उत्तम माहितीप्रमाणें अगर समजुतीप्रमाणें भरून त्यावर आपली सही केली पाहिजे, आणि तें मागण्यांत येईल तेव्हां सदरीलप्रमाणें भरून सही केलेलें असें खानेसुमारीवरील कामगाराच्या किंवा तो फर्माविल त्या मनुष्याच्या स्वाधीन केलें पाहिजे.

११. जर पुढीलप्रमाणें हकीकत असेल तर, ह्मणजे— शिक्षा.

(अ) जर खानेसुमारीवरील कोणताही कामगार पुऱ्या कारणावांचून असा कामगार या नात्यानें काम करण्यास इनकार अगर हयगई करील,

(ब) जर खानेसुमारीवरील कोणताही कामगार जाणूनबुजून व पुऱ्या कारणावांचून कोणताही अपमानकारक किंवा अयोग्य प्रश्न विचारील किंवा कोणताही खोटा मजकूर लिहील,

(क) जर, कोणत्याही मनुष्यास खानेसुमारीवरील कोणत्याही कामगारानें विचारलेल्या कोणत्याही प्रश्नाचें उत्तर आपल्या उत्तम माहितीप्रमाणें अगर समजुतीप्रमाणें देणें कलम ८ वरून त्याला कायद्यानें भाग असून तो तें त्याप्रमाणें देण्यास इनकार करील,

(ड) जर कोणत्याही घराचा, आवाराचा, तारवाचा किंवा इतर जागेचा भोगवटाकरणारा कोणताही मनुष्य खानेसुमारीवरील कामगारास त्या ठिकाणीं जाण्याची जी सवड देणें त्या ९ कलम ९ वरून जरूर आहे, ती देण्यास तो इनकार करील,

(ई) जर कोणताही मनुष्य, ९ व्या कलमाअन्वयें रंगानें घातलेलीं अगर लावलेलीं कोणतींही अक्षरें अगर नंबर तारीख ३१ मार्च १८९१ यापूर्वीं काढून टाकील, पुसून टाकील, बदलील किंवा खराब करील,

(फ) जर कोणत्याही राहत्या घराचा अगर त्याच्या भागाचा कोणताही भोगवटाकरणारा जाणूनबुजून व पुऱ्या कारणावांचून, १० व्या कलमांतील ठरावांबरहुकूम वहिवाट करण्यास चुकेल किंवा त्या कलमाअन्वयें लिहावयाचा कोणताही मजकूर खोटा लिहील,

तर त्याला पराकाष्ठा पन्नास रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा होईल.

फिर्यादींबाबद अधिकार.

१२. (१) स्थानिक सरकारास, सरकारी गॅझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून,—

(अ) या आक्टाखालील फिर्यादी, किंवा जी कोणतीही गोष्ट करण्याविषयीं या आक्टावरून सांगितलें असेल ती गोष्ट करण्यास हयगई किंवा इनकार करण्याबद्दलच्या फिर्यादी कोणत्या वर्गाच्या माजिस्ट्रेटांपुढें मांडाव्या तें ठरविण्याचा, आणि

(ब) सदरहू प्रकारची कोणतीही फिर्याद, स्थानिक सरकारची पूर्वीं मंजुरी घेतल्यावांचून किंवा या बाबतींत त्यानें ज्या कोणा अमलदारास अधिकार दिला असेल त्याची पूर्वीं मंजुरी घेतल्यावांचून आणूं नये असें फर्माविण्याचा,

अधिकार आहे.

(२) या कलमाची रकम (अ) हिच्या अन्वयें जाहिरनामा प्रसिद्ध न होईल तर व होई तोंपर्यंत या आक्टाअन्वयें फिर्यादी आणणें त्या सर्व, कलकत्ता, मद्रास व मुंबई या शहरांत प्रेसिडेन्सी माजिस्ट्रेटांपुढें, आणि दुसऱ्या ठिकाणीं, जिल्हा माजिस्ट्रेटापुढें मांडल्या पाहिजेत.

खानेसुमारीचे कागदपत्र कांहीं मुकदम्यांत पुराव्यास ग्राह्य होणार नाहींत.

१३. सन १८७२ चा हिंदुस्तानचा पुराव्याविषयींचा आक्ट यांत कोणताही ठराव विरुद्ध असला तथापि, कोणत्याही खानेसुमारीवरील कामगारानें असा कामगार या नात्यानें आपलें काम करीत असतांना कोणताही मजकूर कोणत्याही बुकांत, रजिष्टरांत किंवा कागदपत्रांत लिहून ठेवला असेल तो, दिवाणींत चाललेल्या कोणत्याही कामांत किंवा सन १८८२ च्या क्रिमिनल प्रोसीजर कोडाच्या १२ व्या अगर ३६ व्या बाबीअन्वयें चाललेल्या कोणत्याही कामांत पुराव्यास ग्राह्य होणार नाहीं असें समजावें.

मुनशिपालिटींच्या प्रदेशांतील खानेसुमारी करण्याच्या रीतीबाबदचे स्थानिक कायदे व कानू हंगामीं तहकूब ठेवणें.

१४. कोणत्याही मुनशिपालिटीच्या प्रदेशांतील खानेसुमारी करण्याच्या रीतीबाबदच्या कोणत्याही कायद्यांत अगर कानूंत कोणताही ठराव असला तथापि मुनशिपल अधिकाऱ्यास, सन १८९१ सालीं ब्रिटिश इंडियाची खानेसुमारी करण्याकरितां नेमलेल्या वेळीं आपल्या मुनशिपालिटीच्या प्रदेशांतील खानेसुमारी, सर्वांशीं किंवा कांहीं अंशीं, या आक्टावरून ठरविलेल्या कोणत्याही पद्धतीनें करविण्याचा अधिकार आहे असें समजावें.

## हेतु व कारणें यांचें निरूपण.

सदरील आक्टाचा मसुदा सामान्यतः, सन १८८० चा हिंदुस्तानचा खानेसुमारीचा आक्ट याला अनुसरून केलेला असून त्याचा मुख्य उद्देश, स्थानिक सरकारांस या देशांतील ज्या ज्या ठिकाणीं जरूर वाटेल त्या त्या ठिकाणीं, (अ) गणतीकरणारांस, त्यांना दिलेल्या समजुतींबरहुकूम प्रश्न विचारण्याचा व गणतीकरण्याच्या कारणासाठीं आवारांत जाण्याचा अधिकार देण्याबाबद, (ब) योग्य माहिती देण्यास इनकार करण्याबद्दल शिक्षा करण्याबाबद, आणि (क) गणतीकरणारांच्या गैरवर्तणुकीबद्दल शिक्षा करण्याबाबद तजवीज करणें, हा आहे.

तसेंच, इतर ठिकाणीं होणाऱ्या सामान्य खानेसुमारीच्याच वेळीं व तिच्या बदला मुनशिपालिटींमध्यें खानेसुमारी करण्याच्या संबंधानें ज्या मुनशिपल अधिकाऱ्यांबरोबर बंदोबस्त केला असेल त्यांस, केवळ मुनशिपालिटीच्याच कारणाकरितां खानेसुमारी करण्याच्या रीतीबाबदच्या कोणत्याही स्थानिक कायद्यावरून अगर कानूवरून फर्माविलेल्या कोणत्याही पद्धतीऐवजीं अगर रीतीऐवजीं, योजलेल्या आक्टावरून ठरविलेल्या कोणत्याही पद्धतीनें खानेसुमारी करण्याविषयीं अधिकार देण्याकरितां सदरहू मसुद्यांत १४ वें कलम हें नवीन दाखल केलें आहे.

तारीख १० जुलै, सन १८९०.

फिलिप हचिन्स,

(True Translation.)

Y. M. KELKAR,

Oriental Translator to Government.



BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS